




# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २८१ वा ❑ बुधवार दि.०७ जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शिक्षक आता भटके कुत्रे हाकलणार?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षक हा खऱ्या अर्थाने समाजाचा कणा आहे. ते मुलांसाठी आदर्श आहेत, विद्यार्थ्यांसह समाजाला मार्गदर्शन करण्याचे आणि तरुणांना शिक्षण देण्याचे कार्य करतात. शिक्षकांमुळे देश सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अधिक विकसित होत असतो.

शिक्षक हा शिक्षणाचा वैचारिक कणा असताना आता शिक्षकांना शालेय शिक्षण विभाग भटक्या कुत्र्यांच्या हालचाली मोजण्याच्या कामावर लावण्याचे पाप करत आहे. खर तर सरकार,शिक्षण विभागच शिक्षकांचे अवमूल्यन करत आहे.

देशभरात वाढलेली भटकी कुत्री आणि त्यांचा होणारा त्रास, यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्षण संस्थांचे परिसर स्वच्छ व सुरक्षित करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार शिक्षण आयुक्तांनी शाळेतील शिक्षकांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्याबाबत पत्र जाहीर केले होते. शाळेतील सुरक्षा व्यवस्था, कचऱ्याची विल्हेवाट, अन्नपदार्थ न फ `कण्याबाबत सूचना, यासह भटकी कुत्री आढळल्यास महापालिका किंवा तत्सम यंत्रणेला कळविण्याची जबाबदारी शिक्षकांवर दिली आहे. शिक्षण आयुक्तांच्या या सूचनेनुसार जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी सरोज जगताप यांनीही याबाबतचे पत्र काढले असून, त्याला शिक्षक संघटनांमधून विरोध होत आहे.

भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण ही कामे महापालिका व संबंधित प्रशासकीय यंत्रणांची जबाबदारी असताना शासन व प्रशासन शिक्षकावर भटक्या कुत्र्यांची जबदारी सोपवत आहे.

शैक्षणिक संस्था, रुग्णालये, बस थांबे अशा सार्वजनिक ठिकाणी भटक्या श्वानांना हटवून नियोजित निवारा केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर महिन्यात दिले आहेत. या आदेशाचे पालन करण्यासाठी शिक्षण विभागाने ही जबाबदारी शिक्षकांवर टाकली आहे. शाळांमध्ये भटक्या श्वानांचा वावर रोखण्यासाठी शिक्षकांना ''नोडल अधिकारी'' म्हणून नेमण्याचा आदेश शिक्षण निरीक्षकांनी काढले आहेत.

चेंबूर येथील शिक्षण निरिक्षकांनी काढलेल्या एका आदेशामुळे शिक्षकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. सर्वोच्च न्यायालयाचा संदर्भ देत काढलेला हा आदेश शिक्षण व्यवस्थेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणारा असल्याचा आरोप महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने केला आहे.

न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक शाळेतील केवळ एका शिक्षकाला ही जबाबदारी देण्यात येणार आहे. शाळेच्या आवारात स्वच्छता, तसेच भटक्या श्वानांचा संस्थेच्या परिसरामध्ये वावर असणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी नोडल अधिकारी म्हणून प्रत्येक शाळेतील एका शिक्षकाची नियुक्ती करण्याचे आदेश दिले आहेत.खरं तरभटक्या श्वान नियंत्रण, स्वच्छता आणि सुरक्षा ही कामे स्थानिक स्वराज्य संस्थांची असून शिक्षकांना नोडल अधिकारी नेमणे म्हणजे शिक्षकांच्या बुद्धिमत्तेचा आणि सन्मानाचा अपमान आहे.

शिक्षक हे आपल्या समाजाचे सर्वात महत्वाचे सदस्य आहेत. ते मुलांना उद्देश देतात, त्यांना आपल्या देशाचे नागरिक म्हणून यशस्वी होण्यासाठी तयार करतात आणि त्यांच्यात चांगले काम करण्याची आणि जीवनात यशस्वी होण्याची प्रेरणा देतात. आजची मुले उद्याचे नागरिक आहेत आणि शिक्षक हे एक महत्त्वाचे बिंदू आहेत जे मुलाला त्यांच्या भविष्यासाठी तयार करतात.

शिक्षक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशावर, वैयक्तिक वाढीवर आणि आयुष्यभराच्या शिक्षणावर खोलवर परिणाम करू शकतात. प्रभावी सूचना आणि मार्गदर्शनाद्वारे, ते सकारात्मक संबंधांना प्रोत्साहन देतात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रेरित करतात. एक सहाय्यक शिक्षण वातावरण तयार करून, ते विद्यार्थ्यांना भविष्यातील यशासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यास मदत करू शकतात.लहानपणी शिकवलेल्या गोष्टी मुलांना आयुष्यभर पाळायला लागतात. ते जे शिकले आहे त्याचा वापर समाजावर प्रभाव पाडण्यासाठी करतील. प्रत्येकाला माहित आहे की आजचा तरुण उद्याचा भविष्याचा नागरिक बनेल आणि शिक्षकांना त्यांच्या सर्वात प्रभावी काळात – मग पूर्व प्राथमिक शिकवणे असो,किंवा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिक्षण असो, खेळ असो किंवा पारंपारिक वर्ग असो, तरुणांना शिक्षित करण्याचे कार्य शिक्षकच करत असतो.

शिक्षकांमध्ये भविष्यातील तरुणांना समाजासाठी सर्वोत्तम मार्गाने घडवण्याची क्षमता आहे जेणेकरून ते सकारात्मक आणि प्रेरणादायी भावी पिढ्या घडवू शकतील आणि म्हणूनच स्थानिक आणि जागतिक स्तरावर समाजाची रचना करू शकतील. प्रत्यक्षात, शिक्षकांचे काम जगातील सर्वात महत्त्वाचे आहे. ज्यांचा समाजातील मुलांवर प्रभाव पडतो त्यांच्याकडे जीवन बदलण्याची शक्ती असते. केवळ त्या मुलांसाठीच नाही तर सर्वांच्या जीवनासाठी.

विद्यार्थी,समाज व देशाला सक्षम नागरिक देणाऱ्या शिक्षकांना आधीच अशैक्षणिक कामे असताना आता राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आता सर्वोच्च न्यायालयाचा आधार घेत थेट शिक्षकांनाच कुत्रे हाकलण्याच्या कामाला जुंपले आहे. नव्या नियमानुसार, नियुक्त केलेल्या नोडल अधिकारी शिक्षकाचे नाव शाळेच्या प्रवेशद्वारावर लावणे बंधनकारक असून, भटक्या कुत्र्यांचा वावर शाळेत होणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी शिक्षकांची असेल. कोरोना काळात शिक्षकांना करोना काळात शिक्षकांना दारूच्या दुकानांच्या बाहेरील गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी नेमले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वाहनांची तपासणी करण्यासाठी स्थायी नाकाबंदीवर शिक्षकांची नियुक्ती केली होती आता भटके कुत्रे हाकलण्याची जबाबदारी शिक्षकांवर सोपवून शिक्षक विभाग शिक्षकांचा अनादरच नव्हे तर शिक्षकांचे अवमूल्यन करत आहे.

शिक्षकांचे अवमूल्यन होऊ नये यासाठी त्यांना योग्य सन्मान, आर्थिक पाठबळ, प्रशासकीय स्वायत्तता देणे आणि त्यांच्या कामातील आव्हाने समजून घेऊन त्यांना पाठिंबा देणे आवश्यक आहे, कारण शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर मोठा प्रभाव टाकतात आणि समाजाचा आधारस्तंभ असतात. तेव्हा शिक्षकांचे महत्व समजून घेण्याची व शिक्षकांचे अवमूल्यन होणार नाही,याची दक्षता घेण्याची गरज आहे.

# ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासनाचे सर्वतोपरी सहकार्य-मंत्री चंद्रकांत पाटील

## राज्य ग्रंथालय परिषदेची पहिली बैठक

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई – ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी केले. मंत्रालयात राज्य ग्रंथालय परिषदेच्या बैठकीस मंत्री पाटील दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, सहाय्यक धर्मदाय आयुक्त राम लिप्ते, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग उपसचिव तुषार महाजन, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अमोल मुत्याल, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, ग्रंथालय संघ अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रभाकर



घुगे, ग्रंथालय संघ मराठवाडा विभागाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, पुणे विभागाचे अध्यक्ष सोपान पवार, कोकण विभागाचे अध्यक्ष दिलीप कोरे, डॉ. सिद्धी जगदाळे, डॉ. सुभाष चव्हाण, सुनील वायाळ व संबंधित अधिकारी उपस्थित होते.


मंत्री पाटील म्हणाले की, राज्य शासनाच्या निर्णयानुसार १६ वर्षांनंतर राज्य ग्रंथालय परिषद पुन्हा गठीत करण्यात आली आहे. राज्य ग्रंथालय परिषद ही ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनास सल्ला देणारी प्रमुख परिषद आहे. ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ देण्यात येणार असल्याचे तसेच ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येणार असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.

बैठकीत ग्रामीण भागात वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सीएसआर निधी किंवा राजा राममोहन रॉय योजना यांच्या माध्यमातून मोबाईल वाचन व्हॅन खरेदी करून ती गावे, शाळा आणि दुर्गम भागांमध्ये नेऊन वाचन उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. गाव तिथे ग्रंथालय उपक्रम राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाशी समन्वय साधण्याचे निश्चित करण्यात आले. राज्य मध्यवर्ती ग्रंथालय व ६ विभागीय ग्रंथालयांमध्ये फिरते ग्रंथालय सेवा देणे योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरु करणे, तसेच ई-लायब्ररी, ई- लायब्ररी युनिक डेटाबेस, फिरते वाचनालय आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक ग्रंथालयाचे नियतकालिक तीन वर्षानंतर तपासणी करण्यास मंजुरी देण्यात आली. बैठकीत ग्रंथालय संचालनालयाच्या २००८-०९ ते २०२४-२५ या वर्षातील अहवालांना मंजुरी देण्यात आली.

# स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी व्यक्तिमत्व : डॉ. वामन नारायण कुबेर

**ज्योतिर्मय साहित्य**

भारतीय समाजजीवनाची वैशिष्ठे सांगताना संरजामशाही, सावकारी, सामाजिक विषमता, रूढीग्रस्तता या गोष्टींना टाळता येत नाही. महान, उदात्त परंपरांचा घोष करताना इथली शोषणव्यवस्थाही विसरता येत नाही. पण याच अमानुष प्रथा, परंपरांना सुरूंग लावणारं लेखनही याच भूमीत जन्माला आलं. आपलं पोर घासलेटच्या चिमणीच्या उजेडात, सार्वजनिक ठिकाणच्या दिव्याखाली लिहिणाऱ्या आणि तो काय लिहितोय हेही न कळणाऱ्या अक्षरांचा गंध नसणाऱ्या कुटुंबात जन्मलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या भारतीय समाजव्यवस्थेला सुरुंग लावणाऱ्या वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी व्यक्तिमत्व डॉ. वामन नारायण कुबेर यांना स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच राष्ट्रीय चळवळ व अस्पृश्यांचा प्रश्न व्दैत नाहीसे कसे होईल हा प्रश्न नेहमी सतावून सोडी. या विचाराने प्रेरीत होऊन त्यांनी डॉक्टरेटसाठी अ क्रिटिकल स्टडी ऑफ द सोसिअल अँड पॉलिटिकल थॉट ऑफ डॉ. आंबेडकर हा विषय निवडला. या विषयासाठी पुणे विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. दि.का. गर्दे यांचे मार्गदर्शन त्यांना त्याकाळी लाभले. पुणे विद्यापीठाने मान्यता दिलेल्या प्रबंधाच्या वामन कुबेर यांच्या या इंग्रजी ग्रंथाचे प्रकाशन दिल्लीच्या पीपल्स पब्लिशींग हाऊसने केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अभ्यास करून पीएच.डी. मिळविणारे वामन नारायण कुबेर हे पहिले होत.



ज्याकाळात पीएच.डी.ला प्रचंड मान सन्मान होता, पीएच.डी. नोकरी मिळावी, प्रमोशन मिळावे यासाठी केली जात नव्हती, त्याकाळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाने आयुष्यभर झपाटलेल्या वामन कुबेर यांची ही ग्रंथनिर्मिती होय. गेली दोन वर्षे केसरी दैनिकात स्वातंत्र्यलढ्यातील योगदान दिलेल्या व्यक्तींच्या आयुष्यावर चालू असलेल्या लेखांमध्ये मी स्वातंत्र्यसैनिक वामन नारायण कुबेर यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील व इतर योगदानाबद्दल मागील वर्षी लेख लिहिला होता.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा येथे संपन्न झालेल्या १ जानेवारी २०२६ च्या पहिल्या दिवशीच्या ग्रंथदिंडी आणि सातारा जिल्ह्यातील ८० वर्षावरील ज्येष्ठ साहित्यिकांच्या सत्कार समारंभानंतर मी सुपनेकर भोजनालय येथे जेवायला गेलो होतो. दारातच अॅड. सौरभ व्यंकटेश देशपांडे भेटले. नुकताच ज्येष्ठ ८० वर्षावरील साहित्यिक व साताराचे प्रथितयश वकील अॅड. दत्तात्रय देशपांडे यांचा सत्कार ९९ व्या संमेलनात झाला. त्यांचे कुटुंबातील सर्वांचा स्नेहभोजनाचा कार्यक्रम तेथेच सुपनेकर हॉलमध्ये होता. सौरभ यांच्या आपुलकीच्या आग्रहामुळे मी देशपांडे यांच्या कुटुंबाच्या स्नेहभोजनात सहभागी झालो. अचानक सौरभचे वडील अनंत व्यंकटेश देशपांडे यांनी मला सांगितले कि, मी वामनराव कुबेर यांचा जावई. आपण त्यांच्यावर लिहिलेला केसरीमधील लेख मी नेमका त्याचदिवशी पुण्यात असल्याने नेहमीप्रमाणे केसरी वृतपत्र वाचण्यासाठी विकत घेतल्याने वाचावयास मिळाला. माझ्या सास-यांवर आपण लिहिलेला लेख संस्मरणीय असून आपण एका दुर्लक्षित




स्वातंत्र्य सैनिकाबद्दल जे लिहिले आहे त्याबद्दल मी आपला ऋणी आहे. मला त्यांनी हे सांगितल्यावर अतीशय अत्यानंद झाला. सौरभची माझी पुण्यामध्ये कै. डॉ. सदाशिव शिवदे यांच्या घरी साधारणपणे ८-९ वर्षापूर्वी भेट झाली होती त्यावेळेपासून ओळख. अॅड दत्तात्रय देशपांडे यांचे अनंत हे सख्खे भाऊ आणि सौरभ पुतण्या. पण मला त्या दिवसापर्यंत याची काहीच कल्पना नव्हती. मात्र स्नेहभोजनाच्या कार्यक्रमात वामन कुबेर यांची मुलगी, अनंत देशपांडे यांची पत्नी सौ. सुचित्रा (संजीवनी) अनंत देशपांडे यांची ओळख झाली. त्या खेळाडू आणि पदवीधर आहेत. वामन कुबेर यांना दोन कन्या. प्रभा आणि संजीवनी. मोठी कन्या प्रभा (सौ. प्रभा अरुण पोरे) या मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेऊ शकल्या. पानशेत पूर, रहाण्याची गैरसोय व आईची नोकरी यामुळे पुढचे शिक्षण त्या घेऊ शकल्या नाहीत. त्या सध्या आपला मुलगा हेमंत व कन्या संगीता (विवाहित) यासह कांजूरमार्ग-मुंबई येथे राहतात. त्यांचे वय ८० वर्षे पूर्ण झाले आहे. स्वातंत्र्यसैनिक मालक देशपांडे यांचे कनिष्ठ चिरंजीव अनंत देशपांडे ग्रंथपाल-पत्रकार यांचेबरोबर वामन कुबेर यांची कन्या संजीवनी हिचा विवाह १९८० साली झाला.

वामन ना. कुबेर यांचे जावई व्यंकटेश देशपांडे मला सांगत होते... पानशेत धरण फुटल्यानंतर पानशेत सोसायटी, नवी पेठ पुणे याठिकाणी डॉ. वामनराव कुबेर यांनी स्वतःसाठी छोटे घर उभारले व त्यास आशियाना असे नाव दिले. आशियाना म्हणजे काडी-काडी जोडून बांधलेले घरटे. हे घर नेहमी वामनरावांकडे येणा-या प्रा.प्रभाकर लिमये, डॉ. शांता साठे, नारायण सुर्वे यासारख्या समवयस्क अभ्यासकांमुळे जागते राहायचे. घराच्या जिन्याच्या पाय-यांवरही पुस्तकेच पुस्तके असायची. वा.ना. कुबेर यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी मनोरमाबाई त्यांच्याकडे म्हणजे आपली मुलगी संजीवनी कडे पाटण जि.सातारा येथे रहायल्या आल्या आणि आशियाना या घराची जबाबदारी जावई म्हणून ग्रंथपाल अनंत देशपांडे यांनी घेतली.डॉ. वामन कुबेर यांची पुस्तके, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर १९६७ साली लिहिलेला पहिलाच प्रबंध, कुबेर यांना शासनातर्फे मिळालेले सन्मानपत्र, पीएच.डी.चे प्रमाणपत्र आदि साहित्य त्यांच्या आशियाना या घरात (२७ अ, सेनादत्त हौसिंग सोसायटी, नवी पेठ पुणे - ३०) सुरक्षित ठेवले आहे. मात्र अधिकची जी अनेक पुस्तक होती, ती शिवाजी विद्यापीठ-कोल्हापूर ग्रंथालयास देणगी म्हणून दिली आहेत. ती पुस्तके या ग्रंथालयाने सुरक्षीतपणे जपून ठेवली आहेत. वामनराव कुबेर यांची काही पुस्तके मराठी-इंग्रजी प्रकाशन संस्थांनी प्रकाशित केली आहेत. परंतु त्याबद्दल त्यांच्या वारसांना कोणीही काहीच माहिती देत नाही. असेही अनंत देशपांडे यांनी मला सांगितले.

मध्यमवर्गीय गटात समाविष्ट असणा-या वामन कुबेर यांच्या संजीवनी, प्रभा या मुलींनी व जावई व्यंकटेश देशपांडे यांनी पैशाची अभिलाषा न बाळगता वामनराव कुबेर यांचे घर न विकता त्यांची ग्रंथसंपदा व इतर सर्व साहित्य त्या घरात जपून ठेवले आहे. हे समाजाला आदर्श देणारे उदाहरण आहे.पानशेत धरण १२ जुलै १९६१ रोजी फुटले आणि त्याने पुणे उध्वस्त केले. या घटनेमध्ये एक हजारहून जादा जीवितहानी झाली. पण त्याहीपेक्षा पानशेतच्या पुरात संसार साहित्याबरोबर दुर्मिळ ग्रंथ, वेगवेगळ्या व्यक्तींनी त्यांचे आयुष्य खर्ची घालून लिहिलेली टाचणे, साहित्य हेही पानशेतच्या पुरात नष्ट झाले. वामनराव कुबेर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात जो प्रबंध तयार करण्याचा ध्यास घेतला होता आणि त्यासाठी तयार केलेली टाचणे व पुष्कळ बहुमोल साहित्य या पुरात नष्ट झाले . वामनराव कुबेर यांना पावणेदोन वर्षे पुण्यात जागाच न मिळाल्याने त्यांना केसरी च्या अभ्यागत गृहातच आश्रय घ्यावा लागला.

पुन्हा प्रबंधाची जुळणी करीत त्वामनराव यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील प्रबंध पूर्ण केला. वामन कुबेर हे स्वातंत्र्यसैनिक असल्यामुळे पीएच.डी.च्या अभ्यासासाठी त्यांना महाराष्ट्र शासनाची दोन वर्षे शिष्यवृत्ती मिळाली. विशेष म्हणजे अशी शिष्यवृत्ती मिळविणारे महाराष्ट्रातील ते एकटेच. वामन कुबेर यांचा मूळचा प्रबंध आज ऑक्सफर्ड विद्यापीठात आहे. त्याचं तसच्या तसं पुस्तकही मिळतं. त्याची किंमत आहे अठ्ठावीस हजार रूपये. अमेरिकेतील जवळपास सगळी विद्यापीठ, यूरोप, ऑस्ट्रेलिया अशा अनेक देशातल्या महत्वाच्या विद्यापीठांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संदर्भातील अभ्यासासाठी हा ग्रंथ मुख्यतः अधिकृत म्हणून उपयोगी पडतो. या ग्रंथाशिवाय अभ्यासकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील संशोधन करताना पुढे जाताच येत नाही,इतके या ग्रंथाचे महत्व आहे. स्वातंत्र्यलढ्यात दोन वेळा तुरुंगवास भोगलेल्या वामनराव कुबेर यांचे या ग्रंथाचे नाव आहे ''डॉ. आंबेडकर : अ क्रिटिकल स्टडी''.

***





## जात्यावरच्या ओव्या......


चाल, चाल जीवा
पंढरीची वाट
तिथे पांडुरंग उभा
सोड संसाराचा थाट ||४३६||

ओढ लागली जीवाला
विठ्ठल भेटीची
काय भूक तहान?
सुद नाही वेदनेची ||४३७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# ज्ञानतपस्वी आबासाहेब अमृतकार

ज्योतिर्मय साहित्य



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

सुरुवातीला आम्हाला ते मराठी विषय शिकवायचे. पण त्यांचे मराठी शिकवणे केवळ पाठ्यपुस्तक शिकवण्यापुरते मर्यादित कधीच नसायचे. शिकवत असताना विविध प्रकारची माहिती मग ती त्या लेखाबद्दल असेल किंवा लेखकाबद्दल, कवीबद्दल असेल ते ती सांगत असत. त्यांच्या या शिकवण्याच्या पद्धतीमुळेच आम्हाला अवांतर वाचनाची गोडी लागली. त्यांनी शिकवलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कविता, बालकवींच्या कविता, किंवा मंगेश पाडगावकर बा भ बोरकर, भा रा तांबे यासारख्या कवींच्या कविता आजही लक्षात आहे. त्या कवितांमधील सौंदर्य त्यांनी शिकवताना उलगडून दाखवले. इंग्रजी विषय शिकवण्यात तर सरांचा हातखंडा होता. इंग्रजीच्या तासाला सोप्या इंग्रजीतून ते पाठ किंवा कविता समजावून देत आणि विद्यार्थ्यांची परीक्षेच्या दृष्टीने आपोआप तयारी होत असे. व्याकरण शिकवताना देखील असेच सोप्या पद्धतीने विविध उदाहरणे देऊन ते शिकवत असत.

मी आबासाहेबांचा विद्यार्थीही होतो आणि नंतर त्यांच्या हाताखाली काम करणारा सहकारी शिक्षक देखील. त्यांच्या उपस्थितीत शिक्षक म्हणून काम करणे हीसुद्धा माझ्यासाठी अतिशय आनंदाची आणि समाधानाची बाब होती.



पुराणांमध्ये देवांसाठी कार्य करणाऱ्या नवीन सुंदर अशा सृष्टीची निर्मिती करणाऱ्या शिल्पकाराला देवशिल्पी विश्वकर्मा असे म्हटले जाते. आमच्यासाठी सर म्हणजे देवशिल्पी विश्वकर्मा ! असंख्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आपल्या शिकवणुकीने आकार देणारा हा विश्वकर्मा ! त्यांच्या हातांचा परिस स्पर्श ज्यांना ज्यांना झाला, त्यांचे त्यांचे जीवन घडले. देणाऱ्याने देत जावे या कविवर्य विंदा करंदीकर यांच्या उक्तीप्रमाणे ते विद्यार्थ्यांना भरभरून देत गेले. त्यांनी काही धनदौलत, पैसा दिला का ? त्यांनी वाटला तो ज्ञानाचा प्रकाश आणि संस्कारांची शिदोरी. ही जगातली अत्यंत दुर्मिळ गोष्ट ! विकत घेता येत नाही आणि विकताही येत नाही. ती ज्याच्याजवळ असेल, तोच ती इतरांना भरभरून देऊ शकतो. हा प्रकाश आणि ही शिदोरी आजही अनेक विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्याच्या वाटेवर मार्गदर्शन करीत आहे. देणाराने देत जावे या उक्तीनुसार ते भरभरून देत गेले आणि आम्ही आमच्या पात्रतेप्रमाणे घेत गेलो. खरं तर हे दान घेण्यासाठी आमची ओंजळ अपुरी पडली. त्यांचा वारसा यथाशक्ती, यथामती पुढे चालवण्याचा प्रयत्न करतो आहे. **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# ब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

परमार्थ साधना करत असताना ''मी''या शब्दाला खूपच महत्व आहे. परमेश्वराला ''मी''पणा आवडत नाही. मग मला सांगा मित्रांनो संसारात राहून सर्व कर्म करत राहूनजर तुम्ही परमार्थ करत असाल तर तुम्ही परमात्म्याशी एकरूप आहात हेच सिध्द होते. ''मी खरा कोण आहे''हे न कळणं म्हणजे अज्ञान होय. ते अज्ञान नाहीसे झाले की परब्रम्ह सहज भेटतो. व्यवहारी जगातील देहबुध्दीतील मोठेपणाला ब्रम्ह स्वरूपाच्य ठिकाणी काही किंमत नसते. कारण देहबुध्दीतील अहंभाव टाकून द्यायचा आहे.व आपल्याला जे परमात्म्याशी एकरूप व्हायला हवे. ब्रम्हस्वरूपाच्या जवळ ऊंच्चनीच असाभेदभाव नसतो.देवाला सगळी लेकरं सारखेच असतात.राजाला ऊत्तम ब्रम्ह व त्याच्या नौकरांना हलके ब्रम्ह असा फलक ब्रम्ह कधीही करत नाही.समर्थाचे तत्वज्ञान हे व्यापक,भेदरहित सूक्ष्म आणि अतिमानवी आहे. मानवी जीवन हे भेदाने भरलेले आहे.स्वस्वरूपानुभव अभेदाने भरलेले असते.यासर्वाची सांगड घालण्यासाठी ''दासबोध ''वाचलाच पाहिजे।


सद्गुरुला जे ब्रम्हपद मिळते ते प्रत्येक शिष्याला पण प्राप्त होते.''श्रुतीचे वचन आहे की''ब्रम्ह एकच एक असे अद्वितीय आहे.

ब्रम्ह कसे आहे?

ब्रम्ह नवेजूने असे नाही. त्याला कालभेद मान्य नाही. ''मी देह आहे'' ही भावना असणे म्हणजे देहबुद्धी होय.

''मी आत्माच आहे'' अशी बुद्धी होणे म्हणजे आत्मबुध्दी होय. देहबुध्दी हेअज्ञानाचे प्रधान लक्षण आहे तर आत्मबुध्दी हे आत्मज्ञानाचे प्रधान लक्षण आहे.देहबुध्दीतील जोरावर जीव आकुंचित होऊन द्रुष्याच्या नादी लागतो. तर आत्मबुध्दीच्या प्रकाशाने जीव खूप मोठा होऊन ब्रम्ह स्वरूपाशी, समरस होऊन जातो.माणसाची देहबुद्धी जुनाट आहे.ती सुटता सुटत नाही इतकेच नाही तर ती आत्मबुध्दी निर्माण होण्यासपरत परत आड येते. म्हणून माणसाने देहबुद्धी सोडावी.भगवंत आणि संत यांच्या पर्यन्त पोहचायचे आहे तर देहत्वाचे मीपण सोडले पाहिजे.

आपण ३५ व्या ओवीपर्यन्त आलो होतो. संपूर्ण देहाला पूरून उरते ती देहबुद्धी होय. आयुष्य आहे तोपर्यंत मी हे केले मीते केलं मी अमुक करणार असं न संपणार संसाराचा गाडा पुढे ढकलत न न्यायचा असतो तो ही आनंदाने सत्कर्म करत सत्कारणी लावायचा असतो. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# परमेश्वराची खरी पूजा

ज्योतिर्मय साहित्य

देहाभिमान नाहीसा झाला म्हणजे काळजीचे कारण उरत नाही. ‘ मी साधन करतो ’ असा अभिमान देहाभिमानामुळे उत्पन्न होतो. हा साधनाभिमानही घातुक असतो. तेव्हा, जे काही होते ते परमेश्वराच्या सत्तेने होते असे मानीत जावे. आपले हित कशात असते ते त्यालाच उत्तम कळते, आणि तो सर्व तुमच्या बऱ्याकरिताच करीत असतो. तेव्हा कसलीही काळजी करू नये. त्याच्यावर विश्वास टाकून आनंदात असावे. चित्तवृत्ती परमेश्वराकडे लावावी. तेथून ती विषयाकडे जाऊ लागली म्हणजे संधी साधावी; म्हणजे त्यावर लक्ष असावे. मन विषयाकार होऊ लागले म्हणजे माझे स्मरण करावे. बऱ्याच वेळाने आठवण झाली तरी माझे स्मरण करावे, म्हणजे पुढे पुढे लवकर आठवण होऊ लागेल. ज्याचे मन पूजेत असते त्याची खरी पूजा होते. सर्वांभूतीं भगवद्भाव, आणि कोणाचे मन न दुखविणे, ही पूजा खरी होय. पूजेला बाह्योपचाराची गरज नसते. मन मात्र अर्पण होणे जरूर आहे. पूजेत भाव असणे जरूर आहे.

भक्ती आणि वैराग्य यांच्यामध्ये तसा फरक नाही. परमेश्वराची आवड म्हणजे भक्ती, आणि विषयाची अनासक्ती म्हणजे वैराग्य. रामराय वनवासात जायला निघाले तेव्हा त्यांनी सीतामाईला बरोबर न येण्याविषयी सांगितले. त्या वेळी तिने उत्तर दिले की, ‘ रामा ! तुझ्याबरोबर असेन तर मला सर्व कष्ट सुखमय आहेत; आणि तुझ्याशिवाय असेन तर सर्व सुखोपभोग हे मला कष्टमयच आहेत. ’ सीता ही रामाची मोठी भक्त होती, आणि म्हणून तिची अशी अवस्था होती. तिला परिस्थितीची जाणीव नव्हती. पण आपली गोष्ट अशी नाही. आपण एकीकडे परिस्थितीवर अवलंबून आहोत आणि दुसरीकडे आपल्याला भगवंत पाहिजे, म्हणून आपण मध्यम मार्ग धरावा; तो हा की, आपण म्हणावे, ‘ रामा, माझी परिस्थिती तुझ्या इच्छेवर अवलंबून आहे. ’ असे आपण मन:पूर्वक म्हटले की परिस्थिती बदलली तरी आपला आनंद टिकेल.

‘ माझ्या देवाला हे आवडेल का ? ’ अशा भावनेने जगात वागणे हाच सगुणोपासनेचा हेतू आहे. जसजशी आपण सगुणाची उपाधी वाढवतो तसतशी आपली इतर उपाधी कमी कमी होत जाते. सगुणाच्या उपासनेला आज आपण कल्पनेने प्रारंभ करू, मागून निश्चयात्मकता आपोआप येईल. चैतन्य सर्व ठिकाणी भरलेले आहे; ते कुठेही प्रकट होऊ शकेल. त्याला प्रकट करणे हे आपल्या भावनेवर अवलंबून आहे. ज्याची भावना खरी शुद्ध, म्हणजे नि:संशय असते, त्याला दगडाची मूर्तीदेखील देव बनते. भावना मात्र शंभर नंबरी पाहिजे; त्यामध्ये भेसळ उपयोगाची नाही.

उपाधी वासना नाहीशा करण्यासाठीच नाम घ्यायचे असते.



श्री संत ज्ञानेश्वर

अभंग व अर्थ

अभंग २

चिदानंद रुप चेतवितें एक ।
एकपणें गुणागुणीं दावी अनेक ॥१॥
आदि अंतीं गुण सर्वत्र निर्गुण ।
गुणासी अगुण भासतीना ॥ध्रु०॥
कैसें जालें अरुपीं गुणीं गुणवृत्ती ।
सगुण पाहतां अंतरलें गती ॥२॥
बापरखुमादेविवरु विठ्ठलु नंदनंदनु ।
आदिअंतु एकु पूर्ण सनातनु गे माये ॥३॥

अर्थ:-

चिंदानंद स्वरुपाचा तो गुणांच्या मुळे अनेक रुपांनी दिसत आहे. आदि अंत गुणाने तो सर्वत्र निर्गुण रुपात आहे. व त्यामुळे गुणच अगुण झालेले दिसतात. त्या निर्गुणाच्या ठायी हे गुण कसे दिसतात हे कळत नाही. व सगुणरुप पाहता द्विमुढ झाल्याने मनाची गती कशी खुंटते ते कळत नाही. तो नंदाचा नंदन नसुन तो पुर्ण सनातन ब्रह्मच आहे असे माऊली सांगतात



आरोग्य संजीवनी

# अँटिबायोटिक्सचा अतिवापर आणि रोगप्रतिकारशक्ती

ज्योतिर्मय साहित्य

घसा दुखला, सर्दी–खोकला झाला, ताप आला, की अनेक जण लगेच अँटिबायोटिक घेतात. काही वेळा डॉक्टरांकडून, तर कधी स्वतःहून. काही दिवसांनी बरं वाटतं; पण नंतर पुन्हा आजार डोकं वर काढतो. फंक्शनल मेडिसिनच्या दृष्टीने हा केवळ योगायोग नाही. वारंवार अँटिबायोटिक्स घेणं म्हणजे शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीवर थेट हल्ला करणं होय.

अँटिबायोटिक्स नेमकं काय करतात?

अँटिबायोटिक्स वाईट जंतूंना मारण्यासाठी वापरली जातात; पण ती फक्त ‘वाईट’ जंतूच मारत नाहीत, तर आपल्या शरीरातील चांगले जंतूसुद्धा (गुड बॅक्टेरिया) नष्ट करतात. विशेषतः आतड्यांतील मायक्रोबायोम यामुळे मोठ्या प्रमाणात बिघडतो.

आज आपण जाणतो, की सुमारे ७० टक्के रोगप्रतिकारशक्ती आतड्यांमध्ये असते. म्हणजे आतड्यांतील चांगले जंतू नष्ट झाले, तर रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होणं स्वाभाविक आहे.

आतड्यांचं नुकसान आणि ‘लीकी गट’

वारंवार अँटिबायोटिक्स घेतल्यामुळे आतड्यांची संरक्षक भिंत कमकुवत होते. याला ‘लीकी गट’ असं म्हटलं जातं. यामुळे अर्धवट पचलेलं अन्न, विषारी घटक रक्तात जातात आणि शरीर सतत सूज अवस्थेत राहतं. याचा परिणाम म्हणून वारंवार सर्दी–खोकला, अॅलर्जी, त्वचेचे आजार, थकवा, पचनाच्या तक्रारी इत्यादी समस्या वाढू लागतात.

व्हायरल आजारात अँटिबायोटिक्स – मोठी चूक

सर्दी, फ्लू, घसा खवखवणे यांपैकी बहुतांश आजार व्हायरसमुळे होतात. अँटिबायोटिक्सचा व्हायरसवर काहीही परिणाम होत नाही. उलट, ती रोगप्रतिकारशक्ती अजून कमकुवत करतात. फंक्शनल मेडिसिनमध्ये आजार बरा करणं इतकंच महत्त्वाचं नसून, पुढचा आजार टाळणं जास्त महत्त्वाचं मानलं जातं.

अँटिबायोटिक रेझिस्टन्स – भविष्यातला धोका

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

वारंवार अँटिबायोटिक्स घेतल्यामुळे जंतू त्यांना दाद देईनासे होतात. यालाच म्हणतात. उद्या एखादा गंभीर संसर्ग झाला, तर नेहमीची औषधं काम करणार नाहीत, हा मोठा धोका आहे.

फंक्शनल मेडिसिन काय वेगळं सुचवतं?

फंक्शनल मेडिसिन ही प्रिवेंटिव केअरवर आधारित आहे. इथे अँटिबायोटिक्स पूर्णपणे नाकारले जात नाही; पण गरज असेल तेव्हाच वापरण्याचा आग्रह धरते.

तसेच फंक्शनल मेडिसिन हे –

आतड्यांचं आरोग्य सुधारण्याकडे लक्ष देतं.

प्रोबायोटिक अन्न (दही, ताक, आंबवलेले पदार्थ) घेण्यावर भर देतं.

झोप पुरेशी असणं व ताण नियंत्रणात असणं यावर लक्ष देतं.

पोषणद्रव्यांची पूर्तता होण्याकडे भर देतं.

शरीराची अंतर्गत ताकद वाढते, तेव्हा आजार आपोआप कमी होतात.

निष्कर्ष

अँटिबायोटिक्स तात्पुरती आराम देऊ शकतात; पण त्यांचा अतिरेक शरीराची नैसर्गिक संरक्षणव्यवस्था कमकुवत करतो. आज गरज आहे ती पटकन औषध घेण्याची नाही, तर शरीर बळकट करण्याची. खरी रोगप्रतिकारशक्ती गोळ्यांत नसते, ती आपल्या आतड्यांत आणि जीवनशैलीत असते.

****



लघु बोधकथा

♦विश्वासाला तडा♦

*एका लोककथेनुसार राम नावाच्या एका माणसाकडे एक उमदा आणि सुंदर घोडा होता. तो त्या घोड्याची काळजी घ्यायचा. त्यामुळे त्या दोघांचेही एकमेकावर प्रेम जडलेले होते. शाम नावाच्या एका घोड्याच्या व्यापा-याने तो घोडा पाहिला आणि त्याला तो घोडा फारच आवडला. शामने तो घोडा मिळविण्याचे कारस्थान रचले. शामने रामच्या रोजच्या येण्याजाण्याच्या रस्त्यावर भिका-याचे सोंग घेतले व आजारी असल्याचे नाटक करत बसला. दुसरीकडून राम घोड्यावर बसून येत होता तेव्हा शाम जोरजोराने विव्हळू लागला, गयावया करू लागला. रामने ते पाहिले व तो शामपाशी थांबला. शाम रामला म्हणाला,"मी आजारी आहे मला तुझ्या घोड्यावरून पुढच्या गावापर्यंत नेशील का," रामला त्याची दया आली, त्याने त्याला घोड्यावर बसविले, आणि स्वत: पायी चालू लागला. थोडे पुढे जाताच शाम त्याचा घोडा घेऊन पुढे गेला व त्याने पुढील गावी जाऊन तो घोडा विकून टाकला. दुस-या दिवशी शाम रामकडे आला व म्हणाला," अरे मी तुझा घोडा जर विकत मागितला असता तर तू मला तो दिला नसतास म्हणून मला आजारी भिका-याचे सोंग घ्यावे लागले." यावर राम शांतपणे शामला म्हणाला," मित्रा, मी तुला मदत केली होती ही गोष्ट तू इथून पुढे कोणालाही सांगू नकोस कारण तुझी ही गोष्ट ऐकल्यावर जगात कोणीच गरीबांना, गरजूंना मदत करणार नाही. विश्वासघात करणे महापाप आहे"*

*तात्पर्य:- गरजूला मदत करण्यापूर्वी तो खरेच गरजवंत आहे याची खात्री करणे सूज्ञपणाचे ठरते.*

# एचडी चेहरा

**ज्योतिर्मय साहित्य**

उन्हाळ्याची सुटी होती. दिवसभर टीव्हीचा आवाज, पंख्याची घरघर, किचनमधली खडखड, एका पाठोपाठ एक येणाऱ्या ऑर्डर्स, मुलांचा हट्ट आणि उन्हानं जीवाची होतं असलेली तल्कली. जीव मेटाकुटीला आला होता. तेवढ्यात वैष्णवी स्वयंपाकघरात आली आणि 'मी सरबत करणारै कुणी पिणारै का?' अशी आरोळी तिनं ठोकली. त्याबरोबर कृष्णा मी मी असं ओरडत धावत आत आला. माझ्या चेहऱ्यावर असलेल्या ठाम नकाराकडे दुर्लक्ष करून ही जोडी सरबतासाठी खलबतं करु लागली. 'मी सरबत करते तू कपाटातून ते नवेकोरे ग्लास काढ', दीदीची आज्ञा शिरसावंद्य मानून कृष्णा डायनिंग टेबलवर चढला. माझ्या मेंदूने याची दखल घेत पुढच्या आज्ञा योग्य त्या अवयवांना दिल्या आणि मी जवळपास किंचाळलेच.

'कृष्णा, एक जरी ग्लास खाली पडून फुटला ना तर याद राख, तुम्ही असं वागता आणि मग मी चिडले, बडबडू लागले की परत म्हणायचं नाही की तुझं तोंड दिसतं'.

आता कृष्णाला कोलीत मिळालं.

'आई, फक्त बडबडल्यावरच नव्हे तर तू हसलीस तरी तुझं तोंड दिसतंच.

अशावेळी वैष्णवी गप्प कशी बसली असती? ती लगेचच म्हणाली, 'अरे कृष्णा, आईच्या मूडप्रमाणे तिचं चेहरा बदलतो म्हणजे चिडली की वेगळा चेहरा आणि हसली की वेगळाच दिसतो तिचा चेहरा'.

कृष्णा एकदम गंभीर झाला आणि निरागसपणे त्यानं विचारलं, 'दीदी, म्हणजे आई चिडली की एचडी मध्ये दिसतं का तिचं तोंड?

दीदी गालातल्या गालात हसली, तसं कृष्णानं ओळखलं.

लगेच लाडीगोडी लावत तो मला म्हणाला, 'पण आई, आम्ही चुकलो की नाही ते तुझ्या तोंडावरूनच लवकर समजतं.'

तसं वैष्णवीनं कृष्णाला दटावलं.

माझ्या मनात मात्र एक वेगळाच विचार आला.

'आपलं तोंड दिसतं ते आरशात नाही तर मुलांच्या चेहऱ्यावर'

ही घटना म्हणजे वरवर पाहता घरातला एक साधासुधा, विनोदी प्रसंग वाटते. उन्हाळ्याची सुटी, घरातला गोंधळ, माझा ताण, मुलांचा उत्साह आणि त्यातून घडलेला संवाद. पण या साधेपणाच्या आड एक महत्त्वाचं मानसिक वास्तव दडलेलं आहे ते म्हणजे मुलांची तीक्ष्ण



निरीक्षणशक्ती आणि त्यांची भावनिक बुद्धिमत्ता.

लहान मुलं आपल्याला जे दिसतं ते तसंच स्वीकारत नाहीत; ती त्यावर विचार करतात, त्याचा अर्थ शोधायचा प्रयत्न करतात आणि कधी कधी नकळत आपल्यालाच आरसा दाखवतात. कृष्णाचं ''तू हसलीस तरी तुझं तोंड दिसतंच'' हे वाक्य केवळ खोडकर उत्तर नाही, तर एक अत्यंत बारकाईने केलेलं निरीक्षण आहे. आईच्या भावभावनांचा, तिच्या मूडचा परिणाम तिच्या चेहऱ्यावर कसा उमटतो, हे तो अचूकपणे टिपतो.

असं वाचलंय की लहान वयातच मुलांमध्ये भावनिक वाचन करण्याची क्षमता विकसित होत असते. कोण आनंदी आहे, कोण चिडलेलं आहे, कुणाचा मूड बदलतोय हे संकेत मुलं फार लवकर ओळखतात. विशेषतः आईसारख्या प्राथमिक पालकाशी ही संवेदनशीलता अधिक तीव्र असते. आईचा चेहरा, आवाज, हालचाली हे सगळं मुलांच्या मनात खोलवर नोंदवलं जातं, कोणत्या प्रसंगात आई कशी लागेल, कशी रिॲक्ट होईल, याची त्यांना कल्पना असते..

या घटनेत वैष्णवीची भूमिका खूप महत्त्वाची आहे. ती मोठी असल्यामुळे ती केवळ निरीक्षण करत नसून त्यावर तर्क लावणारी आहे. ''आईचा चेहरा मूडप्रमाणे बदलतो'' हे तिचं विधान मुलांच्या तर्कशक्तीची पुढची पायरी आहे. इथे बालमन केवळ भावनांचा अनुभव घेत नाही, तर त्या भावनांचं वर्गीकरण करायला शिकतं.. चिडलेली आई, हसरी आई, शांत आई. हेच वर्गीकरण पुढे सामाजिक नात्यांमध्ये उपयोगी पडतं.

कृष्णाचं ''एचडी मध्ये दिसतं का?'' हे वाक्य विशेष लक्षवेधी आहे. यात आधुनिक भाषेचा वापर आहे, पण भावनिक आशय अतिशय अर्थपूर्ण आहे. चिडलेली आई म्हणजे अधिक ठळक, अधिक स्पष्ट, अधिक जाणवणारी. मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिलं तर नकारात्मक भावना चिडचिड, राग या सगळ्या सकारात्मक भावनांपेक्षा मेंदूवर जास्त ठसा उमटवतात. म्हणूनच ''एचडी'' ही उपमा इतकी नेमकी वाटते.




''आम्ही चुकलो की नाही ते तुझ्या तोंडावरूनच समजतं'' या वाक्यात तर बालमनाचं पूर्ण मनोविश्लेषण दडलेलं आहे. मुलांसाठी नियम, शिस्त, बरोबर-चूक या संकल्पना शब्दांतून कमी आणि पालकांच्या प्रतिक्रियांतून जास्त समजतात. आईचं तोंड, तिचा चेहरा, तिची देहबोली हेच त्यांचं नैतिक मार्गदर्शन असतं. त्यामुळे आई नकळतच मुलांसाठी ''भावनिक दिशादर्शक'' बनते.

माझ्या मनात उमटलेला शेवटचा विचार ''आपलं तोंड आरशात नाही तर मुलांच्या चेहऱ्यावर दिसतं'' हा या संपूर्ण घटनेचा गाभा आहे, असं मला वाटतं.. आपण स्वतःला कसं पाहतो यापेक्षा मुलं आपल्याला कसं पाहतात, हे अधिक महत्त्वाचं ठरतं. मुलं आपली प्रतिकृती नसतात, पण आपलं प्रतिबिंब मात्र नक्कीच असतात.

हा किस्सा पालकत्वाचं एक सूक्ष्म सत्य उलगडतो आपण मुलांना काय सांगतो यापेक्षा आपण कसे वागतो हे त्यांच्यावर अधिक खोल परिणाम करतं. आईचा थकवा, तल्कली, चिडचिड ही मानवीच आहे; पण मुलं त्यातूनही अर्थ शोधतात, निष्कर्ष काढतात आणि आपली समज तयार करतात.

म्हणूनच ''असं का?'' हा प्रश्न केवळ मुलांचा नसून पालकांसाठीही आहे.

आपलं तोंड इतकं स्पष्ट का दिसतं?

आपल्या भावना मुलांपर्यंत इतक्या ठळक का पोहोचतात?

कदाचित कारण एकच

मुलं आपल्याकडे पाहताना फक्त चेहरा नाही, तर आपलं मन वाचत असतात.

याच ठिकाणी पालकत्वाचा एक नाजूक प्रश्न उभा राहतो. जर मुलं इतक्या बारकाईने आपलं मन वाचत असतील, तर आपण सतत संयमी, हसरे, परिपूर्ण असायलाच हवं का? उत्तर बहुधा 'नाही' असंच आहे. कारण मुलांना केवळ आनंदी चेहरा नाही, तर भावनांची प्रामाणिकताही कळते. आई कधी थकते, कधी चिडते, कधी वैतागते हे दिसणंही त्यांच्यासाठी आयुष्याचाच धडा असतो. फरक इतकाच की त्या भावनांनंतर आपण कसं वागतो, त्या हाताळतो कशा, हे मुलं लक्षपूर्वक पाहत असतात.

आई चिडली, पण थोड्याच वेळात शांत झाली; चूक लक्षात आली की हसत स्वीकारली; आवाज चढला तरी माफी मागायला कमीपणा वाटला नाही, हे सगळं मुलांच्या मनात नोंदवलं जातं. भावनांवर नियंत्रण म्हणजे भावना दडपणं नाही, तर त्या ओळखून योग्य मार्गानं व्यक्त करणं, हे त्यांना नकळत शिकवलं जातं.

त्या दिवशी सरबत झालं, ग्लास फुटला नाही आणि माझी चिडचिडही हळूहळू कमी झाली.. पण कृष्णाचा ''एचडी चेहरा'' हा शब्द आणि वैष्णवीचं निरीक्षण मनात रुतून बसलं. कदाचित त्याचनंतर प्रत्येक वेळी आरशात पाहण्याआधी, थोडा वेळ मुलांच्या चेहऱ्याकडे पाहण्याची सवय मला लागली कारण तिथेच माझ्या भावनांचा खरं प्रतिबिंब दिसणार आहे अगदी स्पष्ट, अगदी एचडीमध्ये.

# ''गुंता'' काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न...

**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा : कवयित्री कविता काळे यांच्या ''गुंता'' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सातारा येथे थाटात संपन्न झाला. ३ जानेवारी २०२६ हा दिवस आम्हां महिलांच्या जीवनात आशेचा किरण देणारा दिवस आहे, कारण यामुळे भारतातील स्त्रियांचा जीवनातला अंधार संपला असं म्हणायला हरकत नाही. सावित्रीने जर आमच्या शिक्षणाची वाट खुली केली नसती तर, चूल आणि मूल एवढंच आमचं आयुष्य होत. जिच्या मुळे मी चार अक्षर शिकले अगदी तिच्या जन्मदिनी हा सोहळा आणि ते ही ९९ व्या संमेलनात होत असल्याने हे मी माझे भाग्य समजते असे यावेळी लेखिका प्रतिमा काळे यांनी सांगितले.




डॉ.राजा दीक्षित, अध्यक्ष, राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रा.डॉ.संदीप सांगळे, अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, घनश्याम पाटील,चपराक प्रकाशन, प्रा. हेमंत सामंत, ब्रिटिश कौन्सिल शालेय राजदूत, विश्वास वसेकर, ज्येष्ठ समीक्षक, डॉ.शिवाजी शिंदे, असिस्टंट रजिस्ट्रार, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर, सोलापूर विद्यापीठ. तसेच मसूद पटेल, संजय जगताप, पिंपरी चिंचवड, संतोष गाढवे, राजगुरूनगर, जीवन धेंडे, बार्शी, नवनाथ खरात, करमाळा, आत्तम गेंदे, परभणी, प्रतिमा काळे, निगडी, रघुनाथ कांबळे, पुणे इत्यादिंच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# आज पोरवाल कॉलेजचा स्थापना दिवस

**ज्योतिर्मय साहित्य**

दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील सेठ केसरीमल पोरवाल कॉलेजचा स्थापना दिवस दिनांक ७ जानेवारी रोजी कामठी नगर पालिकेचे नवनियुक्त अध्यक्ष श्री. अजयजी अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली माननीय प्रा. डॉ मनोहर कुंभारे ,संचालक वसंतराव नाईक शासकीय कला समाजविद्यान संस्था नागपूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे.सेठ केसरीमल पोरवाल कॉलेजचा स्थापना शिक्षण प्रसारक मंडळ कामठी अंतर्गत श्री नेमकुमार पोरवाल यांनी आपल्या वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ १९६५ मध्ये स्थापन केले.या महाविद्यालयाची स्थापना होऊन आज ६० वर्ष पूर्ण झालेली असून हे महाविद्यालय या वर्षी हिरक जयंती साजरी करत आहे. नागपूर विद्यापीठांतर्गत ग्रामीण भागातील हे महाविद्यालय अतिशय नावाजलेले असून ग्रामीण भागातील गोर गरीब विद्यार्थी या महाविद्यालयात मोठ्या संख्येने प्रवेश घेतात.गुणात्मक व संख्यात्मक दृष्टीने या महाविद्यालयाने मोठी उंची गाठली असून उत्तरोत्तर हे महाविद्यालय प्रगती करत आहे.






४ जानेवारी २०२६ ला झालेल्या विटा मॅराथॉन मध्ये नशाबंदी व्यवसनमुक्ती चा संदेश देणारे फलक घेऊन जनजागृती करणारे श्री प्रकाश भोंगाळे श्री मंगेश खिलारे श्री शिवाजी खाडे कु श्रेयस भोंगाळे कु सोहम खिलारे कु सुमेरू खिलारे कु शिवन्या खाडे कु संस्कार माळी कु सार्थक खाडे यांच्या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतूक होत आहे




# नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय येथे क्रांतीज्योती सावित्रीआई फुले जयंती साजरी

**ज्योतिर्मय साहित्य**


कुरखेडा - दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा नवसंजीवनी सार्वजनिक वाचनालय देऊळगाव( खरमतटोला) येथे भारत देशाच्या आद्य शिक्षिका, ज्ञानदायिनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या शुभ प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष संतोष ठलाल, सदस्य निर्मला ठलाल, तनुजा लाडे, लिला गोरटकर, विकास खुणे, मालूबाई मुर्वतकार, सुरज गोरटकर प्रामुख्याने उपस्थित होते.याप्रसंगी साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला उपस्थित मान्यवरांनी क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांना अभिवादन केले.




(SIP) सिस्टीमॅटीक इनव्हेस्टमेंट प्लॅन....

माझ्या कडे इनव्हेस्टमेंट करायला येणाऱ्यांना मी जे प्रश्न विचारतो, त्यामध्ये हा एक प्रश्न नक्कीच असतो,"तुम्ही म्युच्युअल फंडामध्ये इन्व्हेस्टमेंट केली आहे काय?"...
या प्रश्नाचे खूप मजेशीर उत्तर बरेच लोक देतात.
" मी म्युच्युअल फंडात इन्व्हेस्टमेंट केलेली नाही, पण मी एसआयपी केले आहे".
खरे म्हणजे एसआयपी अर्थात सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन म्हणजे म्युच्युअल फंडांमध्ये पैसे जमा करण्याची एक पद्धती आहे.
म्युच्युअल फंडामध्ये पैसे जमा करण्यासाठी तीन पद्धती आहेत.
पहिली पद्धत म्हणजे, एक रकमी अथवा लम्सम,
दुसरी पद्धत एसआयपी द्वारे,
आणि तिसरी पद्धत लम्सम आणि एसआयपी एकत्रितपणे.
एस आय पी म्हणजे सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन. हा प्लॅन घेताना तुम्हाला दररोज, आठवड्यातून एकदा, पंधरा दिवसातून एकदा, महिन्यातून एकदा किंवा तीन महिन्यांनी एकदा अशा प्रकारे म्युच्युअल फंडामध्ये पैसे भरता येतात.
हे पैसे भरण्यासाठी दर महिन्याला बँकेला एक लेखी आदेश दिला जातो जेणेकरून बँक दर महिन्याला इन्व्हेस्टरच्या खात्यातून म्युच्युअल फंडाकडे जी रक्कम अनुरेखित केली असेल ती पोहोचती करते.
आणि वरील प्रक्रिया ही कम्प्युटराइज्ड असल्यामुळे आपोआप होत राहते.
इन्वेस्टर ला ठरलेल्या तारखेला बँकेमध्ये तेवढी ठराविक रक्कम शिल्लक राहील याचीच फक्त काळजी घ्यावी लागते.
एस आय पी ची रक्कम तुमच्या खात्यात पैसे नसतील तर जमा होऊ शकत नाही.
पण तुम्ही पैसे भरले नाहीत म्हणून कोणतीही म्युच्युअल फंड कंपनी तुम्हाला दंड आकारत नाही.
पण निर्धारित तारखेच्या दिवशी तुमच्या खात्यावर जर एसआयपीच्या रकमेची तजवीज केलेली नसेल तर बँक मात्र तुम्हाला दंड करू शकते.
साधारणपणे चेक बाउन्स झाल्यावर जो दंड आकारण्यात येत असे तेवढाच दंड एस आय पी ची रक्कम तुम्ही बँकेत शिल्लक ठेवली नाही तर होऊ शकतो.
क्रमश:.....




ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# आंतरराष्ट्रीय वार रेषा : एक भौगोलिक कुतूहल


ज्योतिर्मय साहित्य

पृथ्वीचा अविरत फिरणारा प्रवास हा केवळ खगोलशास्त्रीय घटना नसून मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षणाशी निगडित आहे. सूर्याच्या प्रकाशानुसार बदलणारी वेळ, दिवसरात्र यांचा लयबद्ध क्रम आणि जगभर पसरलेल्या मानवसमूहाला एकाच वेळेच्या चौकटीत बांधून ठेवण्याची गरज, या सर्वातूनच वेळ व दिनांक मोजण्याची शास्त्रीय व्यवस्था उदयास आली. या व्यवस्थेचा पाया म्हणजे रेखांशांची संकल्पना आणि त्यातून निर्माण झालेल्या काल्पनिक पण अत्यंत उपयुक्त रेषा. आज आपण सर्वांनी २०२६ या नवीन वर्षाचे स्वागत केले परंतु हे नवीन वर्षाचे स्वागत करताना वेगवेगळ्या देशात आपण वेगवेगळ्या वेळेला स्वागत केले आहे म्हणजे रात्रीचे बारा वाजले की आपण बारा वाजून एक मिनिटांनी नवीन वर्ष सुरू झाले असे आपण म्हणत असतो परंतु रात्रीचे बारा वाजण्याची वेळ प्रत्येक ठिकाणी प्रत्येक देशात ही वेगवेगळी असते याचे कारण काय हे आपल्याला माहित असले पाहिजे.ग्रीनिच मूळ रेखावृत्त आणि आंतरराष्ट्रीय वार रेषा या दोन रेषा आधुनिक जगाच्या वेळ व दिनांक व्यवस्थेचे मेरुदंड मानल्या जातात. विशेषतः आंतरराष्ट्रीय वार रेषा ही संकल्पना जागतिक दिनांक व्यवस्थेचा कणा मानली जाते.

आंतरराष्ट्रीय वार रेषा ही पृथ्वीवरील एक काल्पनिक रेषा असून ती साधारणपणे १८० अंश रेखांशावर उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत जाते. ही रेषा प्रत्यक्षात कुठेही दिसत नसली, तरी तिचा परिणाम संपूर्ण जगावर होतो. या रेषेचे प्रमुख कार्य म्हणजे पृथ्वीवर दिनांक निश्चित करणे. या रेषेला ओलांडल्यावर दिनांक बदलतो, म्हणूनच तिला 'वार रेषा' असे म्हणतात.

जगातील वेळ मोजण्याचा आधार ग्रीनिच प्रधान मध्यान्ह रेषा (ग्रीन्विच प्राईम मेरिडियन) आहे. ही रेषा ० अंश रेखांशावर असून ती इंग्लंडमधील लंडन शहराजवळ असलेल्या ग्रीनिच (ग्रीन्विच) वेधशाळेतून जाते. म्हणूनच या रेषेला ग्रीनिच मूळ रेखावृत्त असे म्हणतात. १८८४ साली अमेरिकेतील वॉशिंग्टन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय मेरिडियन परिषदेत ग्रीनिच रेषेला संपूर्ण जगासाठी प्रमाण वेळ रेषा म्हणून मान्यता देण्यात आली.

ग्रीनिच रेषेच्या आधारे जगातील वेळ निश्चित केली जाते. या रेषेवरची वेळ ग्रीनिच प्रमाण वेळ म्हणून ओळखली जाते. पृथ्वी ३६० अंशांची असून ती २४ तासांत स्वतःभोवती फिरते. त्यामुळे प्रत्येक १५ अंश रेखांशांमागे साधारण एक तासाचा वेळ फरक पडतो. ग्रीनिच रेषेच्या पूर्वेकडील देशांची वेळ पुढे




जाते, तर पश्चिमेकडील देशांची वेळ मागे राहते. उदाहरणार्थ, भारत हा ग्रीनिच रेषेच्या पूर्वेकडे असल्यामुळे भारताची प्रमाण वेळ ही ग्रीनिच वेळेपेक्षा ५ तास ३० मिनिटे पुढे आहे. त्याचप्रमाणे जपान, चीन आणि ऑस्ट्रेलिया हे देशही ग्रीनिचच्या पूर्वेकडे असल्याने त्यांची वेळ पेक्षा पुढे असते.

याउलट, ग्रीनिच रेषेच्या पश्चिमेकडे असलेले देश पेक्षा मागे असतात. उदाहरणार्थ, अमेरिका, कॅनडा, ब्राझील आणि मेक्सिको हे देश ग्रीनिचच्या पश्चिमेकडे असल्यामुळे तेथील वेळ ग्रीनिच वेळेपेक्षा काही तासांनी मागे असते. अशा प्रकारे ग्रीनिच मूळ रेखावृत्तामुळे जगातील वेळेचे विभाग स्पष्ट होतात.



सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ
मा.उपशिक्षिका कन्या शाळा,
सातारा. फोन :9822749758

ग्रीनिच रेषेच्या अगदी समोर असलेली १८० अंश रेखांशाची रेषा म्हणजेच आंतरराष्ट्रीय वार रेषा होय. ग्रीनिच रेषेमुळे वेळ बदलते, तर आंतरराष्ट्रीय वार रेषेमुळे दिनांक बदलतो.

आंतरराष्ट्रीय वार रेषा ओलांडल्यावर दिनांक बदलण्याचे ठराविक नियम आहेत. जर एखादी व्यक्ती, जहाज किंवा विमान पूर्वे कडून पश्चिमेकडे ही रेषा ओलांडते, तर एक दिवस पुढे जातो. म्हणजे सोमवारनंतर मंगळवार येतो. परंतु पश्चिमेकडून पूर्वेकडे ही रेषा ओलांडली तर एक दिवस मागे जातो, म्हणजे सोमवारनंतर रविवार येतो. त्यामुळे जगात एका ठिकाणी आज, दुसऱ्या ठिकाणी उद्या, तर तिसऱ्या ठिकाणी काल असे एकाच वेळी असते.

आंतरराष्ट्रीय वार रेषा सरळ नसून ती अनेक ठिकाणी वाकलेली आहे. यामागे वैज्ञानिक नसून प्रशासकीय व राजकीय कारणे आहेत. एखाद्या देशात किंवा बेटसमूहात दोन वेगवेगळे दिनांक पडू नयेत, यासाठी ही रेषा वळवण्यात आली आहे. रशिया, अलास्का आणि किरिबाती या भागांमध्ये वार रेषा वाकलेली आढळते. जर ही रेषा पूर्णपणे सरळ असती, तर एका देशात दोन वेगवेगळे दिवस सुरू झाले असते आणि प्रशासन, व्यापार व दैनंदिन जीवनात मोठा गोंधळ निर्माण झाला असता.

आंतरराष्ट्रीय वार रेषा मुख्यतः प्रशांत महासागरातून जाते. महासागरातून रेषा नेण्यामागील उद्देश म्हणजे लोकवस्ती असलेल्या भागांवर तिचा परिणाम कमीत कमी होणे. नकाशावर पाहिल्यास, ग्रीनिच रेषा मध्यभागी असून तिच्या विरुद्ध बाजूस प्रशांत महासागरातून जाणारी, अनेक ठिकाणी वळण घेतलेली रेषा म्हणजे आंतरराष्ट्रीय वार रेषा होय. या रेषेच्या एका बाजूला आजचा दिवस तर दुसऱ्या बाजूला उद्याचा किंवा कालचा दिवस असल्याचे नकाशावर स्पष्टपणे समजते.

भारताच्या संदर्भात पाहिले असता, भारत ८२ अंश पूर्व रेखांशावर स्थित आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय वार रेषेचा भारतावर थेट परिणाम होत नाही. भारताची प्रमाण वेळ ही ग्रीनिच वेळेपेक्षा पाच तास तीस मिनिटे पुढे आहे. म्हणूनच भारतात स्वतंत्र प्रमाण वेळ वापरली जाते.

आंतरराष्ट्रीय वार रेषेचा ऐतिहासिक संदर्भही महत्त्वाचा आहे. १८८४ साली अमेरिकेतील वॉशिंग्टन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय मेरिडियन परिषदेत ग्रीनिच प्रधान मध्यान्ह रेषेला प्रमाण मान्यता देण्यात आली. त्याचाच परिणाम म्हणून ग्रीनिच रेषेच्या विरुद्ध १८० अंश रेखांशाजवळ आंतरराष्ट्रीय वार रेषा निश्चित करण्यात आली. कालांतराने विविध देशांच्या सोयीसाठी तिच्या मार्गात बदल करण्यात आले.

या ठिकाणी किरिबाती देशाचा उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. १९९५ साली किरिबातीने आंतरराष्ट्रीय वार रेषेचा मार्ग बदलला आणि त्यामुळे हा देश नवीन वर्ष सर्वप्रथम साजरे करणारा देश ठरला. त्यानंतर न्युझीलँड ,ऑस्ट्रेलिया, जपान ,दक्षिण कोरिया, चीन, भारत अशा पद्धतीने पूर्व गोलार्धातील देश प्रथम आणि त्यानंतर पश्चिम गोलार्धातील सर्वात शेवट नवीन वर्षाचे स्वागत करणारे अमेरिकेतील काही बेटांचा प्रदेश बेकर आयलँड हवाई अलास्का असे देश येतात.

आंतरराष्ट्रीय विमानसेवा, जहाज वाहतूक, जागतिक व्यापार, उपग्रह व्यवस्था, आंतरराष्ट्रीय परिषद, ऑनलाइन व्यवहार आणि डिजिटल व्यवहार यासाठी अचूक दिनांक असणे अत्यावश्यक आहे. या सर्व व्यवस्था सुरळीतपणे चालण्यासाठी आंतरराष्ट्रीय वार रेषा महत्त्वाची भूमिका बजावते. अशा प्रकारे, आंतरराष्ट्रीय वार रेषा ही पृथ्वीवरील कोट्यवधी लोकांचे दैनंदिन जीवन, आंतरराष्ट्रीय व्यवहार, वैज्ञानिक संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची घडी नीट बसवण्याचे कार्य ही रेषा अत्यंत निःशब्दपणे करत असते. वेळेच्या महासागरात शिस्त निर्माण करणारी ही अदृश्य सीमा मानवाच्या बौद्धिक प्रगतीचे प्रतीक आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय वार रेषा ही केवळ भूगोलातील एक संकल्पना न राहता, मानवी संस्कृतीला कालाच्या प्रवाहाशी जोडणारा एक महत्त्वाचा दुवा ठरते.

# सेवानिवृत्ती एक मध्यांतर....

ज्योतिर्मय साहित्य



सेवेच्या ठरलेल्या कालावधीनंतर किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती ही प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांना ठरलेली बाब आहे व ती अनिवार्य असते. या गोष्टीला अनेक पैलु असतात. एक अधिकारी/ कर्मचारी सेवानिवृत्त होत असेल तर कार्यालयाच्या नजरेतून त्याच्या हातावरील कामकाज उद्यापासून त्याचप्रकारे चालु कसे राहील याची प्रथम तजवीज केली जाते. त्यासाठी तसाच सक्षम अधिकारी/ कर्मचारी नियुक्तीच्या शोधात कार्यालये असतात. कारण कार्यालयाच्या नजरेतून त्यात भावना अडकलेल्या नसतात. प्रत्येक जागेचा व्यक्ती ठराविक काळानंतर बदलत असतो त्यामुळे तिथे व्यक्तीपेक्षा पद म्हणून पाहिले जाते.

परंतु नोकरी करणारा अधिकारी/कर्मचारी हा त्यांनी काम केलेल्या विविध पदामध्ये आपले मन गुंतवलेला असतो. विशिष्ट परिस्थितीत त्यांनी त्या जागा हाताळल्याचे अनुभव, प्रसंग त्यांना माहिती असतात. त्यामुळे ते भावनिक दृष्टया त्या जागेला चिकटलेले असतात. एका मोठया कारकिर्दीची प्रतिभा या नोकरीतून तयार झालेली असते. सोबत अनेक लोक जुडलेले असतात, व त्या पदाच्या अनुषंगाने एक ओळख निर्माण झालेली असते. ज्या कार्यालयाने आयुष्य घडवले, ज्या कार्यालयामध्ये आयुष्याच्या कर्तबगारीचा काळ घालविला ते कार्यालय एके दिवशी सोडण्याचा प्रसंग येतो. त्यामुळे त्या विभागासोबत एक भावनिकतेचे नाते तयार झालेले असते. त्यातून बाहेर पडताना अंतकरण जड होते, पावले जड होतात, ही नैसर्गिक बाब आहे. परंतु सेवानिवृत्ती हा कांही जबाबदारीचा शेवट नसतो. त्या नोकरीतून मिळालेले अनुभव, शहाणपण यातून कुटुंब, समाज यांच्यासाठी कार्य करणे, स्वत:साठी छंद जोपासणे, ध्यानधारणा, अध्यात्म यामध्ये वेळ देणे यासाठी ही एक जागा तयार करुन दिलेली असते. ही निवृत्ती केवळ पदाची नसते. त्या कार्यालयामध्ये काम करताना उपभोगलेली पदे, जागा, सहकाऱ्यांसोबतचा काळ, एकमेकांसोबत केलेले काम, कधी हेवेदावे या सर्व गोष्टीतून होणारी ही निवृत्ती असते. त्यामुळे मनातील कांही जुन्या गोष्टी काढून नव्याने नव्या जगामध्ये प्रवेश करुन काम करण्याची एक नवी संधी असते.

ही सेवानिवृत्ती एका व्यक्तीची नसते. याचे पडसाद परिवारावर सुध्दा होत असतात. कार्यालयाचे कामकाजाचे तास ठरलेले असतात. त्यामुळे घरुन सकाळी उठल्याबरोबर आपल्यासह घरातील व्यक्तींच्या सुध्दा हालचाली सुरु होतात. वेळेवर जेवण तयार करुन देणे, डबे तयार करुन देणे, कार्यालयाकडून आल्यानंतर चहा, पाणी सर्व कांही वेळेच्या वेळेला ठरलेले असते. सेवानिवृत्तीनंतर ती वेळ कुठेतरी चुकते. दिनक्रम बदलतो.

जीवनाचे अनेक पैलु असतात. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर अचानक येणारा मोकळेपणा आणि जबाबदारीचं कमी झालेलं ओझं माणसाला मोकळा वेळ देतं. तो वेळ व्यतीत करणं थोडं सुरुवातीस जिकीरीचं असतं. त्यामुळे या मध्यांतरानंतर नव्या अध्यायाला सुरु करण्याच्या संकल्पना आधिच मनात रुजवुन ठेवले तर मोकळा वेळ त्रास देत नाही. डोक्यात नवीन उद्दीष्ट असतात. नव्या कल्पना असतात, परंतु त्या अचानक अंगवळणी पडत नाहीत. त्यामध्ये नव्या संधी शोधण्यासाठी वेळ जातो. नेमके या काळात मानपानावर परिणाम होतो. खुप कांही लोक खुर्चीला नमस्कार करणारी असतात. सामान्य जीवनात वागताना जी माणसं अत्यंत आदराने समोर यायची ती थोडेसे दूर गेल्याचा भास होतो. कांही लोक चांगलीच असतात परंतु आपल्या सोबत घडलेल्या एखादया घटनेपासून दुरावलेले असतात. त्यामुळे एखाद्याबद्दल विनाकारणच आकस निर्माण झालेला असतो. त्रयस्त म्हणून विचार केला तर कदाचित त्यांचे आपले कुठेही वाकडे नसते. एकाच जागेवर काम करताना असे हेवेदावे होत असतात. कांही माणसं ठराविक वेळेत दूर जातात किंवा आपणास तसा भास होत असतो. हा सर्व समजून घेण्याचा भाग असतो. बऱ्यांच लोकांसोबत आपण खुप चांगले वागत असतो परंतु कुठेतरी ते आपल्याबद्दल वाईट बोलल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे अशा लोकांबाबत मनात संताप निर्माण होतो. परंतु परोपकार मनात ठेऊन जर सेवावृत्ती मनाने जगले तर या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होत नाही. सगळे आहे तिथेच असते. परंतु आपल्या भावना बदलल्या की जागे बदलल्यासारखे वाटते. त्यामुळे अशा कांही गोष्टी दुर्लक्षित कराव्या लागतात. लोकांकडून अपेक्षा ठेवल्या की अपेक्षाभंग होतात. त्यामुळे वेळीच समाजाला ओळखून मन बनवावे लागते. या सर्व सामान्य गोष्टी आहेत व प्रत्येकांनाच लागु आहेत.



माधव सूर्यवंशी माकणीकर
मो. 95278 53953

सेवानिवृत्ती झाली म्हणजे अचानक अस्तित्व संपत नसतात. आपण केलेल्या कार्याची खुप मोठी ओळख ठेऊन आपण बाहेर पडत असतो. आपले सहकारी त्यास साक्षीदार असतात. जोपर्यंत सोबत काम केलेली मंडळी कार्यालयात कार्यरत असते तोपर्यंत त्या कार्यालयात आपल्या नावाचे अस्तित्व टिकून राहते. जते केवळ कार्यालयाच्या मर्यादित नसते तर बाहेर जनमानसात सुध्दा नांव कायम असते. सिडको छत्रपती संभाजीनगर येथे सन १९७०-७१ मध्ये सुरु झाले तरीही सन १९८९ ते १९९२ दरम्यानचा श्रीमान संजय भाटीया यांचा कार्यकाळ सिडको वासियांना आजही परिचीत दिसतो. कारण लोकांच्या दैनंदिन जीवनात त्या माणसांमुळे कांहीतरी बदल झालेले असतात. अशा अनेक अधिकारी वर्गाची आठवण बाहेर लोकांकडुन सुध्दा काढली जाते. कुणी म्हणते त्यांच्यामुळे आमचे घर झाले. मदतीचा स्वभाव असेल तर त्यांची आठवण कुठेना कुठे साठवलेली असते.

श्री. गजानन रामकृष्ण साटोटे साहेब (प्रशासक- सिडको नाशिक, नांदेड, जालना प्रकल्प) हे आज सुमारे ३५ वर्षाची सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी लिपीक पदापासून ते प्रशासक या पदापर्यंत काम करुन आपल्या नावाची एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचा आज सेवानिवृत्तीचा दिवस. त्या

कार्यालयातील रवी राठोड मागील कांही अधिकारी वर्गाच्या विविध आठवणी सांगायचा. त्यात एन.पी. अग्रवाल साहेब, ईश्वर शिंदे साहेब, कढरे साहेब, एकनाथ जगताप अशा अनेक लोकांचे हावभाव तो करुन दाखवायचा. ते पात्र तो पुन्हा जीवंत करुन दाखवचा. त्यामुळे त्या व्यक्तींचे कार्यालयामध्ये आठवणीच्या रुपाने अस्तित्व होते. परंतु राठोड सेवानिवृत्त झाला आणि त्याच्यासोबत त्या आठवणीतील अधिकारी लोकांचे अस्तित्व सुध्दा सेवानिवृत्त झाले. त्यामुळे आपल्या कार्याची चर्चा करणारे, आपल्या सोबत काम करणारी मंडळी जोपर्यंत कार्यालयामध्ये कार्यरत आहेत तोपर्यंत आपले नांव, आपले अस्तित्व त्या कार्यालयामध्ये कायम असते. सोबतची पिढी बाहेर पडली की नव्या पिढीला नावाची सुध्दा ओळख राहत नाही. त्यामुळे आपल्या अस्तित्वासाठी आपले सोबती खुप महत्वाचे असतात. त्यांच्यासोबतच आपल्या नावाचं अस्तित्व टिकून राहते अन्यथा केवळ कागदावर व बोर्डावर असलेली नांवे इतिहास बनुन राहतात.

व्याख्याते गणेश शिंदे सांगतात वर्गामध्ये वर्षभर मुले बेंचवर आपली नांवे लिहीतात. आपल्या नावाचा बेंच आरक्षित करुन ठेवतात परंतु वर्ष संपल्यानंतर तो बेंच सोडून त्यांना जावे लागते. प्रत्येक वर्षीच त्या बेंचवर एखादा विद्यार्थी आपली सत्ता गाजवतो, आपल्या नावाची ओळख निर्माण करतो परंतु वर्ष संपला की तो पुढच्या वर्गात जातो. परंतु तो बेंच मात्र आहे तिथेच असतो. तसेच आहे, जे कांही आहे जिथल्या तिथेच राहणार आहे. फक्त बदलावा लागतो वर्ग प्रत्येकांनाच.

प्रत्येकांनाच आपल्या कार्यकाळात आपण केलेल्या चांगल्या कामाची फळं चांगलीच भेटतातच. तीच शिदोरी जीवनभर कामास येते. हरिपाठामध्ये संत ज्ञानेश्वरांचा एक अभंग आहे – सर्व सुकृताचे फळ मी लाहीन, क्षेम मी देईन पांडुरंगा याचा मतीतार्थ असा आहे की, माझ्या सर्व चांगल्या कामाचे, सत्कर्माचे फलीत किंवा फळ मला पांडुरंग देईल. पांडुरंगाला मी शांती, कुशलता मागेन. त्यामुळे प्रत्येक माणसांनी केलेल्या चांगल्या सत्कर्माचे पांडुरंग त्यांना फळ देईल. कुशल, मंगल ठेवील. सेवानिवृत्ती म्हणजेच नव्या आव्हानासह येणाऱ्या नवीन काळाच्या पुर्वी येणारे एक मध्यांतर असते. त्यामुळे एक इनिंग संपली तरी दुसरी इनिंग सुरु होण्याची ही प्रक्रिया आहे.

अनुषंगाने सामान्यपणे नोकरीतून निवृत्त होणाऱ्या सर्वांसाठीच.

***



## दिगंबर जैन कासार संस्थेच्या दिनदर्शिकेचे सोलापुरात प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

सोलापूर : दिगंबर जैन कासार समाज संस्थेच्या वतीने दरवर्षी समाजोपयोगी दिनदर्शिका प्रकाशित करून मोफत वितरण करण्यात येते. या परंपरेनुसार यावर्षीही सन २०२६ या वर्षाची शैक्षणिक व सामाजिक माहितीयुक्त दिनदर्शिका संस्थेच्या वतीने दिला. जैन कासार मंदिरात थाटात प्रकाशित करून सोलापूर शहर व जिल्ह्यातील समाज बांधवांना मोफत वितरित करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष विजयअण्णा कासार व संस्थापक अध्यक्ष पोपट लाल डोर्ले यांच्या मार्गदर्शन यासाठी लाभले.

या प्रसंगी संस्थेचे राज्य कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार, महिला उपाध्यक्ष ॲड. नीता मंकणी, जैन कासार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, कांतीलाल नळे, उपाध्यक्ष सौ. माणिकताई व्यवहारे, अभिनंदन अगरथडे, सचिन पाटील, प्रा. महावीर लाळे, प्रा. अजित देवसाळे, प्रफुल्ल कंदले, सौ. सीमा विभुते, प्रा. सुरेशबाबू मंकणी, सौ. वाणीश्री कंदले, सौ. स्ननेहलता नळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी संस्थेच्या वतीने गेल्या वर्षभरात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. संस्था समाज बांधवांच्या सर्वांगीण हितासाठी सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी राज्य कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर यांनी संस्थेच्या आगामी उपक्रमांची माहिती देत समाज बांधवांनी संस्थेच्या कार्यात सक्रिय सहभाग व योगदान द्यावे, असे आवाहन केले.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559